# साधी माझी माणसं

-प्रज्ञा हरणखेडकर

# माझी साधी माणसे

प्रज्ञा हरणखेडकर

ई साहित्य प्रतिष्ठान

माझी साधी माणसे (majhi sadhi manase)

Sketch book

संकल्पना, निर्मिती, सजावट आणि सबकुछ : प्रज्ञा हरणखेडकर

prahar26@gmail.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १७ जून २०१४

मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करीत नाही. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांत असे प्रचंड व गगनचुंबी वृक्ष असतील, की ज्यांची नावे जगाला माहीत नाहीत; रानावनांतील कानाकोपऱ्यात असे एखादे रमणीय व सुगंधी फूल फुललेले असेल, की, ज्याचा पत्ता कोणाला लागलेला नाही. समुद्राच्या पोटात अशी गोलबंद व पाणीदार मोत्ये असतील, की ज्याची जगास वार्ता नाही. पृथ्वीच्या पोटात ताऱ्यांसारखे तेजस्वी हिरे असतील; परंतु मानवजातीस त्यांचे अद्यापि दर्शन नाही. वर अनंत आकाशात असे अनंत तारे असतील, की जे पल्लेदार दुर्बिणीतूनही अजून दिसले नाहीत. मोठेपणा याचा अर्थ जगाला माहीत असणे, असा मी करीत नाही. मी निर्दोष होत आहे. हळूहळू उन्नत होत आहे, ही ज्याला जाणीव आहे, तो मोठाच होत आहे.

-साने गुरुजी

# ❊ माझी माणसं साधी माणसं ❊

या अवाढव्य जगातील प्रसिद्ध व्यक्ती आणि त्यांचे आप्त यांच्याविषयी सर्वांनाच कुतूहल असतं, त्यांचे फोटो आणि थोर चित्रकारांनी काढलेली स्केचेस सतत सर्वत्र दिसतात. पण, आपलं स्वत :चही एक जग असतं, आपल्यापुरतं... आपल्यासाठी या जगातील आपल्या व्यक्तीही तेवढ्याच मौल्यवान असतात.

तर, चिमूटभर चित्रकार आणि किंचित कवी या शिदोरीवर ह्याच काही आपल्या व बाकी माझ्या साध्या माणसांसाठी वेळोवेळी बनविलेली शुभेच्छापत्रे आणि स्केचेसचा हा एक फेरफटका ....

कोणीतरी म्हटलं आहे नां...राजहंसाचं चालणं डौलदार असतं म्हणून कावळ्यांनी काय चालूच नये कां ? ?...

-प्रज्ञा हरणखेडकर

# आमचे आई-बाबा



स्व.मनोहर आणि प्रभा वैद्य

अगदी सरळ रेषेत चालणारे, बोलणारे
आणि वागणारेसुद्धा
आमचे आई-बाबा !

स्वभावासारखंच
सरळ आयुष्य जगतांना
रेष कधी वाकडी झाली नाही.

मोहाचे अडथळे दृष्टीआड केले
त्याच सरळपणे
शोकाचे, शल्याचे क्षणही पुसून टाकले.

त्यामुळे सारं जगही अगदी
सरळ वाटलं त्यांना
त्यांच्यासारखंच.

हाच सरळ, निरलस स्वभावाचा
आणि आयुष्याचा वारसा
तुम्हा-आम्हालाही लाभो,
हीच प्रार्थना...

-मेधा, मुकुंद, प्रज्ञा, उत्तरा
जुलै २००८

# माझी माणसं

मुलगी-रेणुका निओगी



# माझी माणसं

## शिरीष हरणखेडकर - माझे 'अहो'



## ❊ माझी माणसं ❊

जावई- अयन निओगी



# माझी माणसं

## मोठी बहीण - मेधा केसकर



# माझी माणसं

धाकटी बहीण- उत्तरा जोशी



# ❊ माझी माणसं ❊

बहिणीचे यजमान - मोहन जोशी



# माझी माणसं

दीर - चंद्रशेखर हरणखेडकर



# माझी माणसं

जाऊबाई- शुभदा हरणखेडकर



# माझी माणसं

जाऊ - शिल्पा देशपांडे



# ❊ माझी माणसं ❊

मित्र आणि व्यावसायिक भागीदार -

अविनाश शाळिग्राम



# माझी माणसं

अविनाशची आई- छाया शाळिग्राम



## ❊ माझी माणसं ❊

जिवलग मैत्रीण कवयित्री भारती डिग्गीकर

(क्वचितच असलेला हा  Hair-cut )



# माझी माणसं

भारतीची आई - श्रीमती सुहासिनी बिर्जे



# माझी माणसं

भाचा- अभिषेक केसकर



# माझी माणसं

मेधाचा दीर - महेश केसकर



# माझी माणसं

महेशचा मुलगा - उदित केसकर



# माझी माणसं

मित्र - रत्नाकर खरे



# माझी माणसं

मैत्रीण - वंदना खरे



# माझी माणसं

रत्नाकरचा भाचा - नितीन मेहेंदळे



## ❊ माझी माणसं ❊

मित्र, चित्रपट निर्माता - प्रशांत घैसास



# माझी माणसं

हृदयेश आर्ट्सचे सर्वेसर्वा -
अविनाश प्रभावळकर



# माझी माणसं

मित्र, प्रसिद्ध व्यावसायिक - संजय साठ्ये



# माझी माणसं

मैत्रीण, इनर व्हील ची प्रेसिडेंट -
निमिषा मिरानी



## ❊ माझी माणसं ❊

मित्र, व्यावसायिक - शंकर खंडारे



# माझी माणसं

मित्र, व्यावसायिक - शंतनु कुलकर्णी



# ❊ माझी माणसं ❊

नवऱ्याचे बॉस - श्रीनिवास कुलकर्णी



# ❊ माझी माणसं ❊

मुलीची Ex बॉस - हेमाली प्रेमजी



# ❊ माझी माणसं ❊

छोटी चित्रकार - दिविजा मामनिआ



# काही आपली माणसं

## आपली माणसं

ब्रह्मविद्या साधक संघाचे संस्थापक,
आमचे प्रेरणास्थान -
आदरणीय दिवेकर सर




# ❊ आपली माणसं ❊

ब्रह्मविद्या साधक संघाचे विश्वस्त,
आमचे स्फूर्तिस्थान-
आदरणीय फडके सर



# आपली माणसं

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर



## ❊ आपली माणसं ❊

सलाम करावा अशा काही व्यक्तींपैकी एक

डॉ. अब्दुल कलाम




# ❊ आपली माणसं ❊

अचंबित करणारी उंची लाभलेले
अभिनेते अमिताभ बच्चन



## आपली माणसं

प्राजक्ताच्या फुलाएवढं आयुष्य
आणि प्राजक्ताचेच गुणधर्म लाभलेली
गुणी अभिनेत्री स्मिता पाटील



## ❊ आमची माणसं ❊

सुसंवादिनी - मंगला खाडिलकर



# माझी माणसं

काही भेटकार्डं, शुभेच्छा, कौतुकं,आठवणी...

भारती माझी मैत्रीण आहे.
साऱ्या मैत्रिणीत भारती माझी जिवलग आहे.
माझ्या भारतीवर माझे प्रेम आहे.
माझ्या भारतीच्या विविधतेने नटलेल्या गुणांचा मला अभिमान आहे.
या गुणांच्या संगतीत रहाण्याचा मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या भारतीच्या सुखी आयुष्यासाठी मनोमन प्रार्थना करीन.
तिचे आरोग्य आणि तिची समृध्दी यात माझेही सौख्य सामावले आहे.



प्र(ति)ज्ञा
२६ एप्रिल २००९

तसं बघायला गेलं तर तू
इतका सामान्य..साधा...
...म्हणजे आचार-विचाराने रे !

तसं बघायला गेलं तर तू
अगदीच 'मीत'भाषी.....
...म्हणजे 'मित्रत्वाची' भाषा बोलणारा रे !

तसं बघायला गेलं तर तू
एकदम आतल्या गाठीचा...
...म्हणजे स्वत:च्या दु:खाला-त्रासाला
आतल्या आत झिरपवून टाकणारा रे !

तसं बघायला गेलं तर तू
एक नंबरचा 'भाई'...
...म्हणजे वडिलकीच्या नात्याने
प्रत्येकावर प्रेमाने अधिकार गाजवणारा रे !


तसं बघायला गेलं तर तू
पराकोटीचा लोभी...
...म्हणजे तुझे कुटुंब, नातलग,
मित्रपरिवार आणि माणसांचा रे !

तसं बघायला गेलं तर
हे सर्व गुणच आहे तुझे...
अवगुणांचे अर्थही बदलवून टाकणारे
सर्वांच्या मनावर राज्य करणारे
...अक्षय.....अविनाशी....!!

**अभिष्टचिंतन !!!**

प्रज्ञा | १४ मार्च २००९




50
अनुराधा सुरेश लेले
ANURADHA SURESH LELE
चितळे परिवार द्वारा प्रत्याभूत
GUARANTEED BY CHITALE PARIWAAR
02 FEB 1964
50
Golden
Jubilee
Year
50
पचास साल
हम सब अनुराधा को
५०वी सालगिरह की
शुभकामनाएँ देते है ।
We all wish
Anuradha
a happy birthday!
प्रज्ञा-शिरीष
Renuka-Ayan
02 FEB 2014

# हीरक महोत्सव

•

श्रीयुत जयंतराव

आन्हिक-अर्चन । जप-तप-अनुष्ठान ।
मनीमानसी ध्यान। श्रीपादवल्लभांचे।।
विमल ब्रह्मपरायण । दिगंबर नाम-संकीर्तन ।
विशेष वैराग्य लक्षण । तुमचे ठायी ।।
सकल भक्तीचे भांडार । सकल भक्तांचे माहेर ।
'अभिषेका'स आधार । आपण दोघे ।।
सहजीवन सत्संग । राहो ऐसेचि अभंग ।
शुभेच्छा तुम्हास उदंड । षष्ठ्याब्दिकारणे ।।

-शिरीष व सौ. प्रज्ञाकडून । २६.४.२०११





प्रिय सरितामामीस,

मुलांसाठी शिवबाची जिजाऊ होतेस
नातवांसाठी प्रेमळ आजी होतेस
संकटात साक्षात दुर्गा भासतेस
संसारात सरितेसम अखंड वाहतेस

इतकं सारं असूनही कुठलाच पवित्रा नाही
तरी पण ६० वर्षात मिळवलंस बरंच काही
सर्व शुभेच्छा तुला आणि नानामामालाही
आनंदयात्रेत तुमच्या उणीव नसो कशाचीही

शिरीष-प्रज्ञा

# प्रिय मेधा,



आजवरच्या वाटचालीत
थोडं-बहुत अपयश आलं
पण पाठोपाठ यशही आलं
सगळंच कसं 50-50

संसाराच्या वाटेवर
बरंच काही गमावलं
तसंच बरंच काही कमावलं
सगळंच कसं 50-50

इथवर मजल मारताना
अर्ध आयुष्य जगून झालं
पण अर्ध अजून जगायचं आहे.
सगळाच हिशोब 50-50

आयुष्याच्या धकाधकीत
दुःखाचा जसा मारा पडला
तसा सुखाचाही वारा आला
सगळंच कसं 50-50

कष्टमय मार्गावर चालतांना
नोकरीपायी वेळ गेला
पण तेवढाच पैसा गाठीशी आला
सगळंच कसं 50-50

१८:२:२००४


उत्तू-मोहनच्या लग्नाला
२५ वर्षे झाली हो ऽऽ।
सहवासाची-संपन्नतेची
सिल्वर-ज्युबिली झाली हो ।।
अनेक जागा - अनेक घरं
बदलून-सजवून झाली हो ऽऽ ।
मनाजोगती जागा मिळवून
प्रशस्त बंगल्यात स्थिरावली हो ।।
आठशे खिडक्या नऊशे दारं
सगळ्यांची हौस भागली हो ऽऽ ।
उत्तू-मोहन आणि कल्पेशची कथा
सुफळ संपूर्ण झाली हो ।।
नोव्हेंबर २००८
।।हार्दिक शुभेच्छा।।

# अभिष्टचिंतन

अ आ आई
म म मका
जुने गाणे विसरा
नवे गाणे शिका ।।

म म मंगेश
लहान हा लेक
मा मा मामी
गृहिणी ही नेक ।।
मी मी मीनल
मु मु मुकुल
सुखी संसाराचे
हे उदाहरण एक ।।

प्रतिकूलतेला
अनुकूलतेत
बदलून बघा हो
झाला आहे शेठ ।।
मो मो मोहन
मा मा मामा
साठीचा हा तरूण
मन'मोहन' मामा ।।



मेधा | मुकुंद | बिट्टी | उत्तू
१९ जानेवारी २००९

अनेकदा जे व्यक्त करायचं राहून जातं...निमित्ताअभावी
महणूनच तर आजचा हा खास दिवस...
तुमच्यावरील प्रेमाच्या अभिव्यक्तिसाठी !

प्रेमपूर्वक शुभेच्छा !



प्रज्ञा - शिरीष - रेणुका
मार्च २००६

# प्रिय खरेकाकू

वय वर्षे साठ
आम्ही सर्व चाट !
कणा अजूनही ताठ
आजाराकडे पाठ !
अशीच राहू दे तुमची-आमची
वर्षानुवर्षे गाठ !!

शिरीष-प्रज्ञा-रेणुका । ३ नोव्हेंबर २००७




अहो गोखलेकाका,


'अभिष्टचिंतन' हा शब्द फार मोठा आहे. तो लिहायला जरा बरा वाटला म्हणून वापरला. खरं सांगायचं तर तुमच्याबद्दल आम्हाला सगळ्यांना आजवर वाटणारं प्रेम, जो आपलेपणा आहे, तो दाखवण्याची आमची इच्छा होती. तुम्ही ७५ वर्षांचे होऊन आम्हाला हा chance दिलात, याबद्दल आम्ही तुमचे मनापासून आभार मानतो. कृतज्ञता दाखवण्यासाठी आम्ही दुसरं काय करणार? आम्ही तुम्हाला काय देणार? 'त्या' शक्तीने तुम्हाला आधीच भरभरून दिलंय, तावून-सुलाखून घेतलंय आणि त्यामुळेच या आयुष्याला 'झळाळून उठणाऱ्या सोन्याचं' परिमाण लाभलंय. त्याच शक्तीने तुम्हाला शतकापर्यंत न्यावं आणि आम्हाला तुमच्या सहवासाचा लाभ द्यावा, हीच आमची 'स्वार्थी' इच्छा!

- मनापासून सर्व 'खरे'

२५.१२.२०११




माधव खाडिलकर
तो कुणी संत नाही
विचारवंत आहे
तो कुणी प्रेषित नाही
कलावंत आहे
तो कुणी योगी नाही
जीवनासक्त आहे
तो कुणी देव नाही
सच्चा माणूस आहे
'उत्तुंग' ध्येयाने झपाटलेला
तो आपला 'माधव' आहे
साठी शांती करूनही
तरूणच राहणार आहे




उत्तुंगचे एक विश्वस्त, नांव त्यांचे यशवंत
कला साहित्य संस्था संघ, यातच असतात सदा व्यस्त

झेरॉक्स कॉपीज काढण्यामधे, असतात ते नेहमीच व्यस्त
हिशेब जर लागला नाही, तर होतात बेजार-त्रस्त

संघ-फाऊंडेशन-उत्तुंग ट्रस्ट, यांच्या पिशव्या अस्ताव्यस्त
कुठलाही संदर्भ मागा मात्र, हवा तो कागद मिळतो बिनधास्त

पार्ले-नवेठ-दादर-पुणे, भरपूर काम अखंड अविरत
भिंगरी लावून पायाला, फिरत असतात हे यशवंत

त्यांच्या उत्साहाकडे पाहून, वाटतो मलाच न्यूनगंड
स्वत:ची निष्क्रियता जाणवून, कधी कधी वाटते खंत

उत्तुंगचे एक विश्वस्त, नाव त्यांचे यशवंत
पंचाहत्तरी पार करूनही, आहेत तब्येतीने चुस्त

शतक महोत्सव साजरा करण्या, ईश्वराकडे एकच हट्ट
उत्तम आयुरारोग्याचा, कायम राहो त्यांच्यावर वरदहस्त

## सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

चित्रात रंगवी लोभस रंग उषेचे
हास्यात जिच्या गे उजळे तेज विभेचे
शतदा उगवावा शुभदिन हा जीवनी
उत्तम आयुरारोग्य लाभो हीच कामना मनी
साक्षीला आहे सहस्त्रचंद्रमा रात्री
आनंदयात्री आमची माई...आनंदयात्री



* उषा आणि विभा - माईंच्या मुली

।। हार्दिक शुभेच्छा ।।

आक्कांचा-दादांचा मुलगा तू
ताईंचा-बाईचा आप्पा तू
भाऊ आणि राजूच्या मधला
सर्वांचा आवडता मोहन तू

कल्पेशचा प्रेमळ पिता तू
उत्तराचा एकनिष्ठ पती तू
आज पन्नाशी गाठूनही
तरुणांना लाजवणारा तू

घरं दाखवणारा तू
घरं सजवणारा तू
भिंती पाडून घरं उभारणारा
कल्पक कलाकार तू

मित्रमंडळीत रमणारा तू
सर्वांत मिसळणारा तू
मोह पाडणाऱ्या दुनियेतला
'मोह' 'न'पडणारा मोहन तू

-प्रज्ञा-शिरीष



## ।।अभिष्टचिंतन।।

सकल दयेचा सागर । सकल गुणांचे भांडार ।
'लोकमंगल'चा आधार । आपण दोघे ।।
दक्षता आणि चातुर्यता । व्युत्पन्नता आणि लीनता ।
उत्तम गुण सर्वज्ञता । तुमचे ठायी ।।
सहजीवन सत्संग । राहो ऐसेचि अभंग ।
शुभेच्छा तुम्हास उदंड । सुवर्णवर्षी ।।



१७ मे २००९

ओये, तू पचास साल का हो गयेला रे!
अपुन का तो विश्वास ही नही बैठता ।
वैसे तेरे बाल देख के तो पता लगता है रे,
पर तेरे पास, वो क्या बोलते है नां.. हां, एनर्जी,
इतना भरेला है कि, लगता है
अभी तो बाल आने की उमर है ।
तू है तो अपुन के ग्रुप में जान है भाई !
और एक बात, अच्छा खासा successful 1st inning खेला है तू...
अब इससे भी जोश में second inning खेलने का हां !
वो भी अपनी पूरी गँग को साथ ले के !
तो इसके लिए .... बहोत बहोत शुभकामनाएँ !!!

ठीक बोला नां ...
MGVM-XI-C

26.4.2009



# आणि मी

माझ्यावर प्रेम करणाऱ्या
मित्र-मैत्रिणींच्याच शब्दात...

### आमची मैत्रीण प्रज्ञा

वैद्यांची माहेरवाशीण बिट्टी झाली हरणखेडकरांची धाकटी स्नुषा
शिरीषची सहधर्मचारिणी, रेणूची आईपेक्षा जास्त मैत्रीण असणारी,
अयनची सासूपेक्षा आई म्हणूनच लाड करणारी, लोकमंगलमध्ये राहणारी
अशी आमच्या घरातलीच एक मैत्रीण प्रज्ञा.

श्रावणातल्या हिरवळीसारखी सदाबहार असणारी
पती कन्या जावई नातलग जिवलग शेजारी
ह्या सगळ्यांना बरोबर घेऊन सुखाने संसार करणारी
अशी आमची खूप जवळची मैत्रीण प्रज्ञा

लाल-पिंगट केसांचा बॉबकट, बारीक कुंकवाचा छोटासा मळवट
कधी कॉन्टॅक्ट लेन्सेस तर कधी चेहरा खुलवणारा चष्मा
गळ्यात सौभाग्य दागिना तर कधी आर्टिफिशिल ज्वेलरीचा एकच मणी
कानात सोन्याची कर्णफुले तर कधी ट्रेनमधे घेतलेले मॅचिंग खडे
अशी आमची साधी पण स्मार्ट मैत्रीण प्रज्ञा

काव्य-शास्त्र-विनोद आणि पाककलानिपुण स्वव्यवसायी
वाचन योगा भविष्य अॅक्युप्रेशर बंगालीही शिकणारी
स्वत:बरोबर घरातल्या प्रत्येकाचे आरोग्य सांभाळणारी
अशी आमची सदा उत्साही फिझिकली फिट मैत्रीण प्रज्ञा

समयोचित साडी ड्रेसचा पेहराव आणि साजेशी आभूषणे घालणारी
बरेचवेळा रेणूचे ड्रेसेस घातल्यामुळे तिच्यापेक्षा लहान दिसणारी
उन्हा-पावसात भटकणारी, नवनव्या वस्तूंचे शॉपिंग करणारी
क्वचित प्रसंगी शिरीषच्या फुलशर्टचे हाफ करून त्याला स्मार्ट बनवणारी
अशी आमची सर्वांची काळजी घेणारी मैत्रीण प्रज्ञा

जराही स्वस्थ न बसता काहीतरी करत राहणारी
कोणत्याही प्रसंगाला हसतहसत पण विचारपूर्वक सामोरी जाणारी
मानेला एक झटका देत समस्येवर झटपट डिसिजन घेणारी
समोरच्या माणसाला अनपेक्षित प्रश्न विचारून त्याच्याच तोंडून हो वदवणारी
अशी आमची हजरजवाबी आणि स्वत:शी ठाम असणारी मैत्रीण प्रज्ञा

जिवलग मैत्रीण भारतीशी तासन्‌तास फोनवर गप्पा मारणारी
तिच्या कवितांचे मोठ्ठे कार्यक्रम करून ते सर्वांपर्यंत पोचविणारी
ऑफिसमधील कामाचे झटपट पण सुबक आणि
क्लाएंटला बघताक्षणी आवडेल असे डिझाईन बनविणारी
प्रसंगी अविनाशशी वाद घालून मग त्यालाच समजून घेणारी
अशी आमची आयुष्यातील एक सहप्रवासी मैत्रीण प्रज्ञा

Cond....

बहुतेक शनिवारी ऑफिसला सुट्टी घेऊन मग नाखुशीनेच
मोबाईलवरून ऑफिसचे काम चालवणारी
घरी असली म्हणजे बहुतेक वेळा कपाट आवरणारी किंवा वाचन करणारी
दररोज रेणूशी आई व मैत्रीण अशा दुहेरी भूमिकेतून तिला सल्ले देणारी
शनिवार-रविवार सोडून इतर दिवशी रात्री १० नंतर बॅटरी डाऊन होणारी
अशी आमची कामसू पण थोडीशी आळशी मैत्रीण प्रज्ञा

मोटारीत पुढच्या सीटवर बसण्याचा हट्ट धरणारी
तरीपण नेहमी ट्रेनने प्रवास करायला आवडणारी
वेळात वेळ काढून निसर्गाशी जवळीक साधणारी
फक्त रेणूसाठी स्वित्झर्लंडला जाणारी
अशी आमची एक प्रवासी मैत्रीण प्रज्ञा

रस्त्याने जाताना स्वतःच्याच तंद्रीत चालणारी
ओळख दिल्यावरसुध्दा कोण ते न ओळखणारी
तरीही या न ओळखणाऱ्यांना नेहमीच जिच्याशी ओळख ठेवावीशी वाटणारी
ट्रेनमधून ऑफिसला येजा करताना ठरावीक लोकांनाच फोन करणारी
गर्दीत एकटी राहूनही स्वतःचीच ओळख विसरणारी
अशी आमची एक जगावेगळी मैत्रीण प्रज्ञा

लहानपणीचा खट्याळपणा, त्या रिबीनीतल्या दोन जाड वेण्या
तो जाड भिंगाचा आणि जाड फ्रेमचा चष्मा
रेणूचे बालपण, रेणूचे वर्ध्याला जाणे, शिरीषचे वापीला जाणे,
रेणूला क्रेशमधे सोडून नोकरीसाठी केलेली धावाधाव,
व्यवसायातील अडचणी - चॅलेंजेस आणि
हे सर्व विसरून वर्धा-वापी-विलेपार्ले या त्रिकोणाचा
एक कोन झालेली आमची मैत्रीण प्रज्ञा

मन मनायला तयार नाही, पण परवाच तिने आयुष्याची सुवर्णवर्ष पार केली
अहो, तिच्याकडे बघून वाटणार नाही पण एक वर्षापूर्वीच ती सासूसुध्दा झाली
भाग्यवान अशी की आयुष्याच्या मध्यावरही संतूर साबणाची जाहिरात तिला शोभली
या तिच्या सुवर्णयुगात माहीत नाही तिने आपल्यासारखी आणखी किती माणसे जोडली
आपण सगळे या तिच्या सुवर्णमाळेतले मणी
कोणी छोटे तर कोणी मोठे, कोणी मधले तर कोणी कडेचे

या सुवर्णाची झळाळी अजूनही पुढे अनेक वर्षे अशी लखलखत राहील
जे पुढे आहेत त्यांना या झळाळीचा खात्रीने आधार मिळेल
जे मागे आहेत त्यांना ही झळाळी प्रकाशाची वाट दाखवेल
जे बरोबर आहेत ते तर त्या झळाळीत केंव्हाच सामावून गेलेत

ही अतूट मैत्रीची झळाळी अशीच लखलखत राहो ही त्या जगदीशाकडे प्रार्थना.

- रत्नाकर-वंदना-प्रशांत खरे
२६.११.२००९

वैद्यांची अवखळ बिट्टी तू
प्रिय प्रज्ञा शिरीषची
रेणूची आई तू जिवलग
झकास सासू अयनची

सृहृदांसाठी निकट सुहृद तू
सख्खी सखी तू सयांची
उद्यमशालिनी कलाविलासिनी
तू परिपूर्णा नारिपणापलीकडची

- भारती डिग्गीकर आणि अविनाश शाळिग्राम । २६.११.२००९



# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी मनांमध्ये सुषुप्तावस्थेत असलेल्या प्रतिभेला जेव्हा उन्मेषाचे धुमारे फ़ुटायला लागतात, जेव्हा ते सुर्यप्रकाशाच्या भॆटीला आतुर होतात तेव्हा प्रकाशक समोर येतात. ई साहित्य प्रतिष्ठान म्हणजे इंटरनेटवरचे प्रकाशकच. स्वतः कवी, लेखक, कलाकारांनी एकत्र येऊन उभं केलेलं एक व्यासपीठ. आजवर चारशेच्या घरात ई पुस्तकं आणि दोन लाख वाचक सभासद.

एकदा यांना भॆटाच.

www.esahity.com


ई साहित्य प्रतिष्ठान®